NEHRU BAL PUSTAKALAYA

# चिमुकली लाट

सुमन चंदावरकर

अनुवाद

नीना हेजीब



नेहरू बाल पुस्तकालय

# चिमुकली लाट


**सुमन चंदावरकर**

अनुवाद
**नीना हेजीब**

सजावट
**सुभाष तेंदळे**

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया


"चिमुकली लाट सर्वात छान," अहिल्या आपल्या आईला म्हणाली.






लाटांची भरती-ओहोटी पाहत ते समुद्र किनाऱ्यावर उभे होते. मोठमोठाल्या लाटा खडकावर आदळत, उसळ्या मारीत, गर्जना करीत किनाऱ्यावर येत होत्या. पाण्याचे तुषार सर्वत्र उडत होते. तेवढ्याच वेगात त्या लाटा माघारी वळत होत्या. साऱ्या वाळूवर लाटांचे पाणी पसरत होते.





लाटांचा भर ओसरला की, जमिनीतील भेगांमधून लहान लहान खेकडे बाहेर पडत. छोटे-छोटे शिंपले ओल्या वाळूवर चमकत होते.

हे सगळे पाहायला किती मजा वाटत होती. पण मोठी लाट अजून काही काही करायची ते मात्र अहिल्येला मुळीच आवडायचे नाही.



"त्या आपल्याला उचलून नेतील?"

"लाटा येत आहेत असे आपल्याला आधी कळाले तर मग नाही उचलून नेणार," आई म्हणाली.

"आणि त्या लाटा माघारी वळताना पायाला गुदगुल्या करतात."


"छोट्या लाटा पण असं करतात?"


"नाही. छोट्या लाटा सौम्य असतात."




चिमुकल्या लाटा खूपच सौम्य असतात. एका लाटेने लगेचच अहिल्येच्या पायाशी चिमुकले तळे तयार केले. तिने आणि तिच्या आईने वाळूचा एक किल्ला केला होता, त्या किल्ल्याच्या खंदकात ती लाट शिरली. चिमुकली लाट माघारी वळली की लगेचच वाळू कोरडी झाली. 'अजून थोडा वेळ लाट थांबली असती तर,' अहिल्येला वाटले. पण लाट अशी थांबत नसते.

समुद्रात राहूनसुद्धा ती अशी पुन्हा पुन्हा येत नसते. अहिल्येला चिमुकल्या लाटेचा स्पर्श माहीत होता. गोड गोड स्पर्श. त्याची सर कशालाच येत नाही.









एके दिवशी अहिल्या तिच्या आईबाबांबरोबर सकाळी सकाळी समुद्र किनाऱ्यावर फिरायला गेली.


"पोहायचं का?" बाबा म्हणाले.

"पोहूया. बघा ना, समुद्र किती शांत आहे!"





मोठ्या लाटा आता दुसऱ्या बाजूला गेल्यासारख्या दिसत होत्या. तेथे जाऊन त्या कोलांटया उड्या घेत होत्या. फक्त चिमुकल्या लाटाच लपणापाणी खेळत होत्या.




मग अहिल्येने किल्ला बांधण्यासाठी नवी जागा शोधली. समुद्राच्या अगदी जवळ होती ती जागा. तिथे चिमुकली लाट सहजच येऊ शकत होती.

पण एकही लाट आली नाही.

बाबा म्हणाले, ''आता ओहोटी आहे ना? म्हणून आली नसेल.'' ते सुद्धा वाळू खोदीत होते. बोगदा तयार करीत होते.

''ते काय आहे बाबा?'' अहिल्येने विचारले.

''समुद्र जेव्हा खूप खूप मागं जातो, तेव्हा किनारा सारा रिकामा होतो.''





“म्हणजे समुद्र कायमचाच मागं जातो का?”

अहिल्येला फार वाईट वाटले. चिमुकली लाट तिला टाटा न करता मुळीच गेली नसती.

“नाही नाही,” बाबा म्हणाले. “समुद्र पुन्हा पुढं येईल. जसा तो आत आत गेला, तसाच हळूहळू पुढं येईल. आणि जसा तो हळूहळू पुढं येईल तशा लाटाही किनाऱ्यावर खळाळू लागतील. पण त्यासाठी बराच वेळ आहे. मग त्याला आपण भरती म्हणतो.”

बाबांनी तिला आणखी सांगितले की, “आकाशातला चंद्र समुद्राच्या पाण्याला आत ओढतो आणि पुढं खेचतो.”



"म्हणजे समुद्र कायमचाच मागं जातो का?"

अहिल्येला फार वाईट वाटले. चिमुकली लाट तिला टाटा न करता मुळीच गेली नसती.

"नाही नाही," बाबा म्हणाले. "समुद्र पुन्हा पुढं येईल. जसा तो आत आत गेला, तसाच हळूहळू पुढं येईल. आणि जसा तो हळूहळू पुढं येईल तशा लाटाही किनाऱ्यावर खळाळू लागतील. पण त्यासाठी बराच वेळ आहे. मग त्याला आपण भरती म्हणतो."

बाबांनी तिला आणखी सांगितले की, "आकाशातला चंद्र समुद्राच्या पाण्याला आत ओढतो आणि पुढं खेचतो."






अहिल्येने आभाळाकडे पाहिले. सूर्य हळूहळू वर येत होता. तेजस्वी किरणांना घेऊन. पण चंद्र कुठे आहे? तो तर कुठेच दिसत नाही. तिला जर तो दिसला असता, तर अहिल्येने त्याला गमाडी गम्मत सांगितली असती.

आता चिमुकली लाट वाळूच्या किल्ल्याकडे येणार नाही.

'चंद्रानं आपला विचार बदलला तर किती मजा येईल!' तिला वाटले.






तिचे बाबा तिला वेडावत म्हणाले, ''बाळ, आपण काय करणार त्याला?''

ते तिला शिंपले गोळा करून देऊ लागले. त्यांना एक छानसा शिंपला सापडला. वाळूत किल्ला बांधताना त्यांनी तो तिथे ठेवला.









मध्येच एक लाट उसळून वर आली आणि ती सारे शिंपले उचलून नेऊ लागली. अहिल्येचे वडील लगबगीने पुढे गेले आणि त्यांनी शिंपले उचलले. नक्कीच ही चिमुकली लाट नसणार. चिमुकली लाट असे कधीच करणार नाही. पण आहे कुठे ही चिमुकली लाट?

वाळूचा किल्ला आता खूप खूप मोठा झाला होता. पहिल्यापेक्षा मोठा. त्याला तीन मोठमोठे दरवाजे होते. चार बोगदे.

किल्ल्यावरील घुमट बनवले होते अहिल्येच्या बादलीच्या साह्याने. घुमटावर शंख उभे करून लावले होते.






अहिल्येच्या वडिलांनी एका छोट्याशा काठीला आपला हातरुमाल बांधला आणि त्याचा झेंडा तयार केला. सर्वात उंच घुमटावर तो लावला.

"सुंदर," एक पाऊल मागे घेत, झेंड्याकडे पाहत ते म्हणाले.

"पण सारा खंदक तर कोरडाच आहे," अहिल्या हळूच म्हणाली. तिला खूप खूप वाईट वाटले. चिमुकल्यां लाटेने सगळाच गोंधळ करून टाकला.

"जाऊ दे." बाबा म्हणाले, "ये. आण तुझी बादली. आपण बादलीनं पाणी भरून ओतू."





आणि त्याचवेळी अहिल्येच्या पायाजवळ छोटे छोटे तुषार उडाल्यासारखे झाले. पाण्याचा एक लहानसा ओघळ खंदकात शिरला. खंदक सारा भरून गेला.

"अरे, माफ कर हं," चिमुकली लाट हलकेच कानात कुजबुजली. अहिल्येलाच ते फक्त ऐकू आले.

बाबांचा तर आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आई पोहून वापस आली, तेव्हा त्यांनी तिला सांगितले, "पण भरती तर अजिबात नव्हती. कुणास ठाऊक ही छोटीशी लाट आली तरी कुठून? आली आणि फक्त खंदक भरून गेली."





अहिल्या काहीच बोलली नाही. तिने आपला हात खंदकामध्ये घातला. चिमुकल्या लाटेलाही जाणवले, अहिल्येला किती आनंद झाला आहे.



Printed at Jugnu Offset Delhi-32

रु. 18.00

ISBN 81-237-3737-8

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

